केंद्रीय विद्यालय उभारण्यासाठी केंद्रीय विद्यालय संगठन, नवी दिल्ली यांनी रितसर मान्यता दिलेल्या विद्यालयांना शासकीय जमीन भोगाधिकार मुल्यरहित व महसूल मुक्त किंमतीने कब्जेहक्काने व "भोगवटादार वर्ग-२" या धारणाधिकाराने प्रदान करण्याबाबत...

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग,
शासन निर्णय क्र.जमीन २९२६/प्र.क्र.०५/जमीन-०४अ
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२
दिनांक : ०६ मे, २०२६

संदर्भ :- १. विभागीय आयुक्त, कोकण विभाग यांचेकडील क्र.मशा/कार्या-२/जमीन-२/नाचणे/केंद्रीय विद्यालय/कावि-ई ७५१४५७९/२०२५, दि.१४.०१.२०२६ चा प्रस्ताव.

वाचा :- १. महाराष्ट्र जमीन महसूल संहिता १९६६ मधील कलम ४०.
२. शासन परिपत्रक, महसूल व वन विभाग क्र.जमीन-०९/२०१२/प्र.क्र.७९/ज-१, दि.३०.११.२०१२.
३. शासन अधिसूचना, महसूल व वन विभाग क्र.जमीन-२०१५/प्र.क्र.५५/ज-१, दि. ३१.१२.२०१५.

प्रस्तावना :-

केंद्र शासनाच्या दि. ०६.१२.२०२४ रोजीच्या मंत्रीमंडळ बैठकीमध्ये नवीन ८५ केंद्रीय विद्यालय सुरू करण्यास मान्यता देण्यात आलेली आहे. त्यामध्ये, महाराष्ट्रातील काही जिल्ह्यांचा समावेश करण्यात आलेला आहे. त्यानुषंगाने, केंद्रीय विद्यालय संघटन, नवी दिल्ली यांचेकडील दिनांक २७.१२.२०२४ रोजीच्या पत्रान्वये केंद्रीय विद्यालय सुरू करण्यासाठी महाराष्ट्रातील अकोला, जि. अकोला व मौजे नाचणे, जि. रत्नागिरी येथील सुनिश्चित केलेली शासकीय जागा नि:शुल्क कायमस्वरूपी किंवा नाममात्र भाडेतत्त्वावर हस्तांतरीत करण्याची विनंती करण्यात आलेली आहे. त्यास अनुसरून, केंद्रीय विद्यालय संगठन, नवी दिल्ली यांनी केंद्रीय विद्यालय उभारण्यासाठी रितसर मान्यता दिलेल्या मौजे नाचणे म्यु. आत, ता. जि. रत्नागिरी येथील स.नं. ९३, एकूण क्षेत्र १०.३०.०० हे.आर. पैकी क्षेत्र २.५०.०० हे.आर. ही शासकीय जमीन शासन अधिसूचना दिनांक ३१.१२.२०१५, महाराष्ट्र जमीन महसूल संहिता १९६६ चे कलम ४० तसेच महाराष्ट्र जमीन महसूल (शासकिय जमिनीचे वितरण करणे) नियम, १९७१ मधील नियम क्र.५, ६ व ५० मधील तरतूदीनुसार भोगाधिकार मुल्यरहित व महसूल मुक्त किंमतीच्या कब्जेहक्काने व "भोगवटादार वर्ग-२" या धारणाधिकाराने हस्तांतरीत करण्यास तसेच, महाराष्ट्रातील इतर जिल्ह्यांमध्ये केंद्रीय विद्यालये उभारण्याकरीता केंद्रीय विद्यालय संघटन, नवी दिल्ली यांनी रितसर मान्यता दिलेल्या विद्यालयांना शासकीय जमिनी प्रदान करण्याबाबत प्राप्त होणाऱ्या प्रस्तांवांना शासकीय जमीन भोगाधिकार मुल्यरहित व महसूल मुक्त किंमतीने कब्जेहक्काने व "भोगवटादार वर्ग-२" या धारणाधिकाराने हस्तांतरीत करण्यास दि.२९.०४.२०२६ रोजीच्या

मा. मंत्रिमंडळाच्या बैठकीत निर्णय घेण्यात आलेला आहे. त्यानुषंगाने, केंद्रीय विद्यालय उभारण्यासाठी केंद्रीय विद्यालय संगठन, नवी दिल्ली यांना शासकीय जमीन भोगाधिकार मुल्यरहित व महसूल मुक्त किंमतीने कब्जेहक्काने व “भोगवटादार वर्ग-२” या धारणाधिकाराने प्रदान करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे.

**शासन निर्णय :-**

महाराष्ट्र राज्यामध्ये रितसर मान्यता प्राप्त केंद्रीय विद्यालय उभारण्यासाठी केंद्रीय विद्यालय संगठन, नवी दिल्ली यांनी शासकीय जमिनीची मागणी केल्यास व तशी शासकीय जमीन निर्बाध्यरित्या वाटपास उपलब्ध असल्यास, केंद्रीय विद्यालय उभारण्यासाठी शासकीय जमीन भोगाधिकार मुल्यरहित व महसूल मुक्त किंमतीने कब्जेहक्काने प्रदान करण्यात यावी. तथापि, सदर जमिनीचा धारणाधिकार हा “भोगवटादार वर्ग-२” म्हणूनच राहील.

सदर शासन निर्णय वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्र.१३४/२०२६/व्यय-९ दि.२५.०२.२०२६ अन्वये प्राप्त अभिप्राय, तसेच मा. मंत्रिमंडळाच्या दिनांक २९.०४.२०२६ रोजी घेतलेल्या निर्णयास अनुसरून निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संकेताक २०२६०५०६१३२६५५४४१९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

MANISHA K
JAYBHAYE

Digitally signed by MANISHA K JAYBHAYE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=REVENUE AND FOREST DEPARTMENT,
2.5.4.20=01343097b2445ecf81676f921be86528e4e82e29792fd17cca89302f5fd01ef6, postalCode=400032, st=Maharashtra,
serialNumber=3B4284299520D55C5401385D853BB77E465E2E417BCFDDF3EBB6235BB48DEEFA, cn=MANISHA K JAYBHAYE
Date: 2026.05.06 13:27:48 +05'30'

**( मनिषा जायभाये )**
**सह सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

१. मा. राज्यपाल यांचे प्रधान सचिव, राजभवन, मुंबई.
२. मा. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई-३२.
३. मा. उप मुख्यमंत्री (नगर विकास) यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई-३२.
४. मा. उप मुख्यमंत्री (रा.ऊ.शु.) यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई-३२.
५. मा. मंत्री (महसूल) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई-३२.
६. मा. राज्यमंत्री (महसूल) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई-३२.
७. मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय,मुंबई -३२.
८. अप्पर मुख्य सचिव (वित्त विभाग), मंत्रालय, मुंबई -३२.
९. अप्पर मुख्य सचिव (शालेय शिक्षण विभाग), मंत्रालय, मुंबई-३२.
१०. सह सचिव (प्रशासन), केंद्रीय विद्यालय संगठन, शिक्षा मंत्रालय, भारत सरकार.
११. अपर मुख्य सचिव (महसूल) यांचे विकाअ/ स्वीय सहायक, मंत्रालय,मुंबई -३२.

१२. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)/(लेखा परिक्षा) महाराष्ट्र १/२, मुंबई/नागपूर.
१३. विभागीय आयुक्त (सर्व)
१४. जिल्हाधिकारी (सर्व)
१५. जमाबंदी आयुक्त व संचालक, भूमी अभिलेख, महाराष्ट्र राज्य, पुणे.
१६. सर्व सह सचिव / उप सचिव, महसूल व वन विभाग (जमीन-समूह), मंत्रालय, मुंबई.
१७. निवडनस्ती, कार्यासन जमीन-४अ, महसूल व वन विभाग, मंत्रालय,मुंबई -३२.